राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

क्रमांक-तक्रार-४१५/२०२४ दिनांक :- २७ ऑक्टों.,२०२५

श्री. हेमंत गांजरे,
८७, विठ्ठल नगर-२, नागपूर -४४००३४ -- **तक्रारदार**

जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२,
शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, नागपूर, ता. जि. नागपूर --**जन माहिती अधिकारी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद, नागपूर, ता. जि. नागपूर -- **प्रथम अपिलीय अधिकारी**

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार आयोगास दिनांक ०५.०९.२०२४ रोजी (RTI/S१८/०२०/२०२४) थेट तक्रार अर्ज सादर केला आहे. या तक्रार अर्जा मध्ये तक्रारदार यांनी " ३० दिवसांत माहिती न दिल्याबाबत तसेच विहित ३० ते ४५ दिवसांत प्रथम अपीलाची सुनावणी न घेणे आणि निर्णय पारीत न केल्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत" असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये — The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is

aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक ०७.०६.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक कार्यालय, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक वर्ग-२ यांनी दिनांक ०४.०७.२०२४ च्या पत्रान्वये अपिलार्थीस मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून माहितीचा अर्थबोध होत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत या कार्यालयाअंतर्गतची कार्यप्रणाली समितीच्या मर्यादेस्तव असतात. इतर समितीत्याबाबत माहिती देणे करीता स्वतंत्र अर्ज करावा. महाराष्ट्र माहितीचा अधिकार, २००५ भाग चार -३ क नुसार अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माहिती मिळण्यासाठीचा लेखी विनंती अर्ज एकाच विषयाशी संबंधित असावा, असे नमुद आहे. करीता अर्जदाराने प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र अर्ज करावा, असे कळविले. त्यानंतर तक्रारदार यांनी " जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणे आणि खोटे विधान करणे तसेच माहिती न देणे" असे कारण नमुद करुन कलम १९ (१) अन्वये दिनांक १५.०७.२०२४ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) कार्यालय, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "३० दिवसांत माहिती न दिल्याबाबत तसेच विहित ३० ते ४५ दिवसांत प्रथम अपीलाची सुनावणी न घेणे आणि निर्णय पारीत न केल्यामुळे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवर शास्ती आणि शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत" असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, त्यांनी कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपिल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : नागपूर
दिनांक: २७.१०.२०२५

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

जा.क्र. 5877 दि. 7 NOV 2025

E:\SD \तक्रारशाखा\\थेटतक्रारआदेशहेमंतगांजरे\